देशोन्नती

# वाळू चोरी प्रकरणी दोघांना एक वर्षाचा कारावास

देशोन्नती वृत्तसंकलन

**हिंगोली :** तालुक्यातील बासंबा पोलिस ठाण्यांतर्गत कळमकोंडा शिवारात वाळूची चोरटी वाहतूक करणाऱ्या दोन ट्रॅक्टर चालकास एक वर्ष साधा कारावास व प्रत्येकी २ हजार रुपये दंडाच्या शिक्षेचा निर्णय प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी आय. जे. ठाकरे यांनी मंगळवारी १४ जानेवारीला दिला आहे.

याबाबत बासंबा पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बासंबा पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक मदन गव्हाणे, जमादार शेळके यांचे पथक ४ जानेवारी २०२१ रोजी गस्तीवर होते. यावेळी टाकळी ते कळमकोंडा मार्गावर ट्रॅक्टरमधून वाळू वाहतूक केली जात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यावरून पोलिसांनी कळमकोंडा शिवारात ट्रॅक्टरची तपासणी केली असता त्यात वाळू आढळून आली. याबाबत पोलिसांनी चालक सुधाकर गंगावणे व संदीप गंगावणे यांचयाकडे विचारणा केली असता त्यांनी खेड येथून वाळू आणल्याचे सांगितले. यावरून पोलिसांनी सुधाकर गंगावणे व संदीप गंगावणे यांच्या विरुध्द बासंबा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला.

विना प रवाना वाळूची चोरटी वाहतुक करताना पोलीसांनी पकडलेल्या दोन ट्रॅक्टर चालकास न्यायालयाने ठोठावली प्रत्येकी एका वर्षाचा कारावास व आर्थिक दंडाची शिक्षा.

## हिंगोली न्यायालयाचा निर्णय



**सहा साक्षीदारांची झाली होती तपासणी** बासंबा पोलीसांनी दाखल केलेल्या या प्रकरणात एकूण सहा साक्षीदार होते. या सर्व साक्षीदारांची तपासणी- उलट तपासणी घेण्यात आली होती. या प्रकरणात साक्ष, पुरावे, पंचनामा व तपास काटेकोरपणे करण्यात आल्याने आरोपींना शिक्षा झाल्याचे वकीलानी सांगितले.

सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक मदन गव्हाणे, कैलास गुंजकर यांच्या पथकाने अधिक तपास करून न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले होते. सदर प्रकणात सहा साक्षीदार तपासण्यात आले. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने ट्रॅक्टर चालक सुधाकर गंगावणे व संदीप गंगावणे यास प्रत्येकी एक वर्षाचा साधा कारावास व प्रत्येकी दोन हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली आहे. प्रकरणात सरकार पक्षातर्फे विशेष सहाय्यक सरकारी वकील ॲड. जी. के. जगताप यांनी काम पाहिले.

**वाळू माफियावर बसणार जरब**

एरव्ही वाळू चोरीबाबतची प्रकरणे सतत दाखल होत असतात. अलिकडच्या काळात वाळू चोरी प्रकरणी शिक्षा झालेले हे पहिलेच प्रकरण आहे. पोलीसांच्या काटेकोर तपासामुळे या प्रकरणात आरोपींना झालेल्या शिक्षेमुळे वाळू माफियावर जरब बसेल, असे बोलले जात आहे. जिल्हाभर प्रत्येक वाळू घाटावर वाळू माफियाचेच राज असल्याने गुन्हेगाराचे एक नवे दालन निर्माण झाले होते. पोलीस व न्यायालयाच्या या कारवाईमुळे वाळू माफियावर जरब बसली आहे.